आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२ ऑक्टोबर २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त देशाची आदरांजली

- स्वच्छ भारत अभियानाच्या दशकपूर्ती निमित्त राज्यभरात विविध कार्यक्रम

- साताऱ्याच्या स्वयंचलित पाणीपुरवठा प्रकल्प आणि नळजोडण्यांना अद्ययावत मीटर बसवण्याच्या कामाचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं उद्घाटन

- पुण्यात बावधन इथं हेलिकॉप्टर दुर्घटनेत तीन जणांचा मृत्यू

**आणि**

- पहिली खो-खो विश्वचषक स्पर्धा पुढच्या वर्षी भारतात होणार

**<><><><><>**

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि देशाचे दुसरे प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त आज देशानं त्यांना आदरांजली वाहिली. महात्मा गांधी यांची आज १५५ वी जयंती आहे. त्यानिमित्त देशासह परदेशातही विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि केंद्रीय मंत्र्यांनी नवी दिल्लीत गांधीजींच्या राजघाट इथल्या समाधीस्थळी पुष्पांजली अर्पण केली. त्यानंतर त्यांनी विजयघाट इथं शास्त्रीजींना आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित **नांदेड** पोलीस परिक्षेत्रातल्या नांदेड, लातूर, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यात आजपासून व्यसनमुक्त गाव मोहिम राबवली जाणार आहे. त्या व्यतिरिक्त या पोलीस परिक्षेत्रातल्या चारही जिल्ह्यांमध्ये तंटामुक्त गाव समित्या स्थापन केल्या जाणार  आहेत.

महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त **धुळे** जिल्हाधिकारी कार्यालयात आज अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

**राष्ट्रपिता** महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त **रत्नागिरी** जिल्हा प्रशासनानं आज परिसर स्वच्छता अभियान राबवलं. तसंच जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आलं.

**<><><><><>**

गांधी जयंतीनिमित्त आज सर्वत्र स्वच्छता दिवस साजरा करण्यात आला. स्वच्छ भारत अभियानाला दहा वर्ष पूर्ण झाल्या निमित्त नवी दिल्ली इथं आयोजित कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांसमवेत भाग घेतला. यावेळी स्वच्छतेशी संबंधित नऊ हजार सहाशे कोटी रुपयांच्या अनेक प्रकल्पांचा प्रारंभ त्यांच्या हस्ते झाला. यात अमृत प्रकल्प स्वच्छ गंगा राष्ट्रीय अभियान आणि गोबरधन योजनेअंतर्गत १५ बायोगॅस प्रकल्पांचा समावेश आहे.

अमृत-२ योजनेंतर्गत सातारा पालिकेच्या स्वयंचलित पाणीपुरवठा प्रकल्पाचं तसंच नळजोडण्यांना  अद्ययावत मीटर बसवण्याच्या  कामाचं उद्घाटनही मोदी यांनी दूरस्थ  पद्धतीनं केलं. स्वच्छता  ही प्रत्येकाची  जबाबदारी असून यासाठी प्रत्येकानं कार्यरत राहणं गरजेचं आहे, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

मध्य रेल्वे विभागानं ‘ स्वच्छता ही सेवा ‘ उपक्रमांतर्गत राबवलेल्या स्वच्छता पंधरवड्याची आज सांगता झाली. या पंधरवड्यात मध्य रेल्वेनं स्वच्छतेशी संबंधित विविध उपक्रम राबवले.

<><><><><>

स्वच्छता अभियानात सहभागी झालेल्या जळगावच्या नकुल पवार यानं या कामातून समाधान मिळाल्याचं सांगितलं.

**होल्ड बाईट -**

<><><><><>

राष्ट्रीय महामार्गाच्या बांधणीच्या सामग्रीमध्ये ८० लाख टन विलगीकृत कचऱ्याचा वापर करण्यात आला असल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितिन गडकरी यांनी आज नागपुरात सांगितलं. महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त नागपूर महापालिकेतर्फे आयोजित श्रमदान कार्यक्रमात ते बोलत होते.

<><><><><>

पुण्यात बावधन इथं आज सकाळी हेलिकॉप्टर कोसळून झालेल्या दुर्घटनेत तीन जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन वैमानिक आणि एका अभियंत्याचा समावेश आहे. हे हेलिकॉप्टर पुण्याहून मुंबईच्या दिशेने निघालं होतं. बावधन परिसरातून आज सकाळी पावणे सात वाजता हेलिकॉप्टरने धुके असताना देखील उड्डाण केलं, त्यानंतर हा अपघात झाला. घटनास्थळी पुणे महानगरपालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तसंच अग्निशमन दलाकडून बचावकार्य करण्यात आलं.

-<><><><><>

सातारा शहरातल्या माची पेठेतल्या एका दुकानात स्फोट होऊन झालेल्या दुर्घटनेत एक जण ठार तर एक जण गंभीर जखमी झाला. स्फोटामुळे परिसरातली घरं आणि गाड्यांच्या खिडक्या फुटल्या. स्फोटाचं कारण शोधण्यासाठी बॉम्ब शोधक आणि नाशक पथक घटनास्थळी दाखल झालं.

<><><><><>

खो -खो या देशी खेळाची पहिली विश्वचषक स्पर्धा पुढच्या वर्षी भारतात होईल, असं भारतीय खो- खो महासंघ आणि आंतरराष्ट्रीय खो- खो महासंघानं आज जाहीर केलं. ५४ देशांमध्ये हा खेळ खेळला जातो,  या स्पर्धेत मात्र ६ खंडातले २४ देशांतले १६ पुरुष संघ आणि तितकेच महिला संघ सहभागी होणार आहेत. ही स्पर्धा आठवडाभर चालेल. या स्पर्धेमुळे या खेळाला असलेल्या समृद्ध वारशाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली जाणार आहे. आधी मातीत खेळला जाणारा हा खेळ आता मॅटवर खेळला जातो.  या स्पर्धेच्या निमित्तानं भारतीय महासंघ १० शहरांमधल्या २०० शाळांमधे सदस्यत्व मोहीम राबवणार आहे.

<><><><><>

साखर कारखान्यांच्या एफआरपी प्रमाणे साखरेचा किमान हमीभाव वाढवण्याचं आश्वासन केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी दिल्यामुळे उसाला चांगला दर देणं शक्य होईल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार आज म्हणाले. सातारा जिल्हा बँकेच्या अमृत महोत्सवाच्या सांगता समारंभात ते बोलत होते. सहकार हा विकासाचा पाया असल्याचंही पवार यांनी यावेळी म्हटलं.

<><><><><>

आगामी निवडणुकीत ओबीसी समाजाने साथ दिली तर वंचित बहुजन आघाडीला तीन आकडी जागा मिळतील असा विश्वास वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केला आहे. ते मनमाड इथं आदिवासी सत्ता संपादन परिषदेच्या वेळी बातमीदारांशी बोलत होते. मराठा समाजाला इतर मागासवर्गीय प्रवर्गात आरक्षण देऊ नये, या मागणीला वंचित बहुजन आघाडीनं पाठिंबा जाहीर केला आहे. आदिवासी आणि ओबीसीं समूहांना एकत्र करून तिसरी आघाडी स्थापन करणार असून नागपूरला या तिसऱ्या आघाडीच्या नावाची अधिकृत घोषणा करू असं ते म्हणाले.

<><><><><>

शारदीय नवरात्रोत्सवाला उद्यापासून प्रारंभ होत असून त्यानिमित्त बाजारपेठा सजल्या आहेत. आश्विन शुद्ध प्रतिपदेला घटस्थापना केली जाते. नवरात्रीच्या नऊ दिवसात देवीच्या नऊ रुपांची पूजा केली जाते. यंदा पावसाचं सावट असूनही सजावटीसाठी लागणारं साहित्य, मातीचे घट, झेंडूची फुलं यांच्या खरेदीसाठी राज्यात बहुतेक सर्व बाजारपेठांमध्ये गर्दी दिसून येत आहे. घरगुती तसंच सार्वजनिक मंडळांमध्ये देवीच्या प्रतिष्ठापनेची तयारी मोठ्या उत्साहात सुरु आहे. रंग, उत्साह आणि आनंदाचं प्रतीक असलेल्या या नवरात्रीनिमित्त सर्वत्र उत्साहाचं वातावरण आहे.

<><><><><>

राज्यातल्या धर्मादाय कार्यालयाचं काम कौतुकास्पद असून या विभागानं अधिकाधिक लोकाभिमुख कामं करावीत, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्ष, धर्मादाय रुग्ण योजनेसाठीची ऑनलाईन प्रणाली आणि रुग्णांकरता उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता हेल्पलाईनचं उद्घाटन आज फडनवीस यांच्या हस्ते मुंबईत झालं, त्यावेळी ते बोलत होते.

उपमुख्यमंत्री वैद्यकीय सुविधा सहायता हेल्पलाईन विषयीची माहिती १८०० १२३ २२११ या क्रमांकावर २४ तास उपलब्ध होणार आहे.

<><><><><>

इंटरनॅशनल शूटिंग स्पोर्ट फेडरेशनतर्फे आयोजित ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशिप नेमबाजी स्पर्धेत महिलांच्या २५ मीटर पिस्तुल प्रकारात भारताच्या दिवांशी हिने सुवर्ण पदक पटकावलं. तसंच, भारताच्या तेजस्विनी, दिवांशी आणि विभूती भाटिया यांनी महिलांच्या २५ मीटर पिस्तुल स्पर्धेच्या सांघिक प्रकारात देखील सुवर्ण

पदकाची कमाई केली. सध्या या स्पर्धेत भारत १० सुवर्ण, एक रौप्य आणि तीन कांस्यपदक अशा १४ पदकांसह पदकतालिकेत आघाडीवर आहे.

**<><><><><>**

धुळे जिल्हयातल्या शिंदखेडा तालुक्यात सोनेवाडी गावात आज पहाटे तापी नदीवर परिवारासह गेलेल्या चुलत भावा-बहिणीचा बुडून अंत झाला. एका धार्मिक विधीसाठी हे दोघं नदीपात्रात उतरले होते. एकजण बुडू लागल्यावर दुसर्याने वाचावायचा प्रयत्न केला, मात्र ते दोघंही बुडून मरण पावले.

**<><><><><>**

ठाणे शहराच्या कोपरी परिसरात भूमिगत गटारांचं काम सुरु असताना जेसीबीचा धक्का महानगर गॅस निगमच्या पाईपला लागून गॅस गळती झाली. त्यामुळे सुमारे ५०० ग्राहकांचा गॅसपुरवठा सुमारे ५ तास खंडित झाला होता. दुपारी साडेबाराच्या सुमारास हा अपघात झाला, त्यानंतर अग्निशमन दल आणि महानगर गॅस निगमच्या कर्मचाऱ्यांनी दुरुस्ती करुन गॅस पुरवठा पूर्ववत केला.

**<><><><><>**

पुढच्या सात दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**